# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.11.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान आज कर्नाटक, गोवा दौऱ्यावर, कर्नाटकात सुवर्ण तीर्थ मंडपाचं करणार उद्घाटन
2. देशाचं अणुउर्जा क्षेत्र खासगी उद्योगांसाठी खुलं करण्याची पंतप्रधानांची घोषणा
3. राष्ट्रपतींचा आज लखनौ दौरा, ब्रह्मकुमारी संस्थेच्या कार्यक्रमात होणार सहभागी आणि
4. गोव्यात सुरू असलेल्या इफ्फीचा आज होणार समारोप

**पीएम कर्नाटक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक आणि गोव्याला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान ते कर्नाटकातील उडुपी इथल्या श्रीकृष्ण मंदिराला भेट देऊन मंदिरात होत असलेल्या लक्ष कंठ गीता पारायण कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. तसंच मंदिराच्या गर्भगृहासमोरील सुवर्ण तीर्थ मंडपाचं उद्घाटनही ते करतील. त्यानंतर पंतप्रधान गोव्यात श्री संस्थान गोकर्ण परतागली जीवोत्तम मठाच्या 550 व्या वर्षाच्या समारंभात सहभागी होणार असून मठात कास्य धातुपासून बनवलेल्या 77 फुट उंचीच्या श्रीरामाच्या मूर्तीचं आणि रामायणावर आधारित उद्यानाचं उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर एका विशेष टपाल टिकीटाचं आणि नाण्याचं अनावरण मोदी यांच्या हस्ते होणार असून ते उपस्थितांना संबोधितही करणार आहेत.

**पीएम- छत्तीसगढ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या छत्तीसगड दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते छत्तीसगडमध्ये होणाऱ्या पोलिस महासंचालक, निरीक्षक आणि महानिरीक्षकांच्या 60व्या अखिल भारतीय परिषदेत सहभागी होणार आहेत. रायपूरमध्ये ही तीन दिवसांची परिषद होत आहे. पोलिसांसमोरची प्रमुख आव्हानं आणि त्यांनी केलेल्या प्रगतीचा आढावा घेणं, विकसित भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत सुरक्षित भारत तयार करण्यासाठी भविष्यातील रूपरेषा आखणं हा या परिषदेच्या आयोजना मागचा उद्देश आहे.

**पंतप्रधान-स्कायरूट**

देशाचे अणुउर्जा क्षेत्र, खासगी उद्योगांसाठी खुले करण्याच्या दृष्टीने सरकार पावलं उचलत असल्याचं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केलं. खासगी उद्योगांना अवकाश क्षेत्रात प्रवेश दिल्याची बाब अधोरेखित करतानाच, यामध्ये सातत्याने सुधारणा करण्यास वाव असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं. हैदराबादमध्ये स्कायरूट इन्फिनिटी कॅम्पसचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. या सुधारणांमुळे भारताच्या ऊर्जा क्षेत्राची सुरक्षितता आणि तंत्रज्ञान नेतृत्वाला नव्याने बळकटी मिळेल असं त्यांनी नमूद केलं. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते, स्कायरूटच्या पहिल्या उपग्रह प्रक्षेपक विक्रम 1 चे अनावरणही झाले.

**मुर्मू-लखनौ**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज लखनौच्या दौऱ्यावर जाणार आहेत. जागतिक एकता आणि विश्वास यांसाठी ध्यान धारणा या संकल्पनेवर आधारित ब्रह्मकुमारीज् संस्थेच्या उपक्रमाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यानिमित्ताने राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर, राष्ट्रपती भारत स्काऊट आणि गाईडच्या हीरक महोत्सवाच्या सांगता समारंभात सहभागी होणार असून, त्या 19व्या राष्ट्रीय जांबोरीला संबोधित करणार आहेत.

**राष्ट्रपती-ओडिशा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल ओडिशा विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी भुवनेश्वर इथं सदस्यांना संबोधित केलं. ओडिशा राज्य समृद्ध होण्यासाठी आणि नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी समर्पित भावनेने काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केलं. पंचवीस वर्षांपुर्वी ओडिशा विधानसभेच्या आमदार म्हणून राजकीय कारकीर्दीला सुरुवात केल्याची आठवण राष्ट्रपतींनी सांगितली.

**बिर्ला-बुर्किनाफासो**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल दिल्लीत अफ्रिका खंडातील बुर्किना फासो राष्ट्राच्या संसद अध्यक्ष उस्माने बोगौमा यांची भेट घेतली. बिर्ला यांनी समाज माध्यमांवरील संदेशामध्ये, उभय देशांमधील द्वीपक्षीय सहकार्यात नवे आयाम खुले करणाऱ्या वाढत्या विकासाभिमुख भागीदारीविषयी चर्चा झाल्याचं नमूद केलं आहे. कायदाविषयी कामकाजातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि तांत्रिक प्रगतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजीटल संसदेचा वापर यावर बिर्ला यांनी प्रकाश टाकला असं त्यांनी म्हटलं आहे.

**इफ्फी-समारोप**

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या 56 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज युझफूल घोस्ट या थाई चित्रपटानं सांगता होणार आहे. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना या समारंभात श्रद्धांजली वाहाण्यात येईल. गेले आठ दिवस रंगलेल्या या महोत्सवात 81 देशांतील 240 हून अधिक चित्रपट प्रदर्शित झाले. समारोपाच्या सोहळ्यासाठी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू आणि महोत्सवाचे अध्यक्ष शेखर कपूर आदी मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. आजच्या समारोपामध्ये गोल्डन पीकॉक, सिल्व्हर पीकॉक आणि आयसीएफटी युनेस्को पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

**आसाम- बहुपत्नीत्व प्रतिबंधक विधेयक**

आसाम विधानसभेनं हिवाळी अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी, बहुपत्नीत्व प्रतिबंधक विधेयक, 2025 मंजूर केलं. वैवाहिक दायित्व मजबूत व्हावं आणि महिलांना अधिक संरक्षण मिळावं यासाठी या विधेयकात देशातील अतिशय कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत. या विधेयकानुसार, पहिलं लग्न कायदेशीररित्या रद्द न करता दुसरं लग्न केल्यास तो गुन्हा ठरवण्यात येईल. पहिलं लग्न लपवणाऱ्या व्यक्तींना 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास, आणि, पहिलं लग्न कायदेशीररित्या रद्द न करता, दुसरं लग्न केल्यास सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची तरतूद याविधेयकात आहे. या विधेयकानुसार, अशा प्रकारचा गुन्हा वारंवार करणाऱ्या गुन्हेगारांना कायद्यानुसार दुप्पट शिक्षा होईल, तसंच असे विवाह लावणाऱ्या धार्मिक धर्मगुरूंना दीड लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद आहे.

**युजीसी**

उच्च शिक्षण संस्थांनी वेळेवर परीक्षा घ्याव्यात आणि अंतिम पदवी आणि प्रमाणपत्र त्वरीत जारी केली जातील, याची खात्री करावी असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजेच युजीसीने दिले आहेत. शिक्षण संस्थांकडून केल्या जाणाऱ्या विलंबामुळे अनेकदा विद्यार्थ्यांची पुढील संधी हुकते, परिणामी उत्तम आणि योग्य रोजगार मिळण्यासही अडथळा निर्माण होत असल्याचं आयोगानं नमूद केलं आहे. वेळेवर परीक्षा घेणे आणि निकाल जाहीर करणं हा विद्यार्थ्यांचा अधिकार असल्याचं यूजीसीनं म्हटलं आहे.

**नौदल-पासिंग**

इझिमला इथल्या भारतीय नौदल अकादमीमध्ये उद्या हिवाळी सत्रातील दीक्षांत संचलनाचे आयोजन करण्यात आलं आहे. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यावेळी उपस्थित राहाणार आहेत. उत्तीर्ण झालेले कॅडेटस् नौदल, तटरक्षक दल तसंच मित्र राष्ट्रांच्या नौदलात अधिकारी म्हणून सामील होतात. भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाच्या प्रशिक्षणार्थीसह बांगलादेश, मालदीव, मोझांबिक, म्यानमार, सेशेल्स, श्रीलंका आणि व्हिएतनाममधील प्रशिक्षणार्थी परेडमध्ये भाग घेतील.

**हाँगकाँग आग**

हाँगकाँगमध्ये एका इमारतीला लागलेल्या आगीच्या घटनेत आतापर्यंत 83 जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. तर 283 लोक अद्यापही बेपत्ता आहेत. इमारतीमध्ये अनेक लोक अडकले असल्याचं हा आकडा वाढण्याची शक्यता स्थानिक अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे.

**फ्रान्स सैन्य**

फ्रान्समध्ये तरुणांसाठी नव्या स्वयंसेवी सरक्षण सेवा कार्यक्रमाची घोषणा काल फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन यांनी केली. नव्या वर्षांत ही योजना लागू होणार असून, 18 ते 19 वर्ष वयोगटातील तीन हजार तरुण सहभागी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या तरुणांना दहा महिन्यांच्या कालावधीसाठी समाविष्ट केले जाणार असून देशांतर्गत मोहिमांमध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे.

**फुटबॉल**

फुटबॉलमध्ये, 17 वर्षांखालील एएफसी आशिया करंडक 2026 स्पर्धेच्या पात्रता फेरीच्या ड गटात आज भारतीय संघाचा सामना लेबनानच्या संघाशी होणार आहे. हा सामना अहमदाबाद इथं संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल. ड गटात चार गुणांकासह दुसऱ्या स्थानावर आहे. गटविजेता संघ या करंडकासाठी पात्र ठरणार आहे, त्यामुळे भारताच्या दृष्टीनं आजचा सामना महत्त्वाचा आहे.

**पंतप्रधान-क्रिकेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल महिला दृष्टिबाधित दिव्यांग विश्वकरंडकविजेत्या क्रिकेट संघाची भेट घेतली. संघाने स्वाक्षऱ्या केलेली बॅट पंतप्रधानांना भेट दिली. भारतीय महिला संघाने अंतिम सामन्यात नेपाळला पराभूत करुन करंडक उंचावला. समाज माध्यमांवरून लिहिलेल्या संदेशात, या खेळाडूंनी त्यांचा प्रेरणादायी अनुभव सामाईक केल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं आहे.

**वादळ**

श्रीलंकेची किनार पट्टी आणि बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेल्या डिटवाह या चक्रीवादळाचा प्रवास वायव्येकडे होत असून, आज ते सकाळी उत्तर तामिळनाडू आणि लगतच्या दक्षिण आंध्र किनाऱ्याकडे सरकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला असून, समुद्रातील मच्छिमार बोटींना बंगालचा उपसागर, मन्नार आणि कोमोरिन परिसरातून 1 डिसेंबरपर्यंत दूर राहाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**हवामान**

पंजाबमध्ये आज थंडीची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. तसंच हरियाणा, चंदीगड, दिल्ली, हिमाचल प्रदेश आणि ओडिशातील काही ठिकाणी दाट धुक्याची शक्यता वर्तवली आहे. दरम्यान, तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकलमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.